ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम - आदिवासी उप योजने अंतर्गत सन २००६-०७ या आर्थिक वर्षात हाती घेण्यात आलेल्या योजनांसाठी निधीचा दुसरा हप्ता मुक्त करण्याकरिता हागंदारी मुक्तीची अट शिथिल करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००७/प्र.क्र.१४/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ९ फेब्रुवारी, २००७**

३५७१५

वाचा: शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क. ग्रापापु १००५/प्र.क.७४ (२)/पापु-०७, दिनांक २ मे, २००५.

प्रस्तावना:

प्रस्तावनेतील शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनेची मागणी करताना संबंधित गावाने, गाव १००% हागंदारी मुक्त करण्यात येईल असा ग्रामसभेचा ठराव देणे आवश्यक असून, योजनेसाठी निधीचा दुसरा हप्ता मागणी करताना गांव १००% हागंदारी मुक्त झाले असेल तरच निधीचा दुसरा हप्ता मुक्त करण्याची अट घालण्यात आली आहे.

२. आदिवासी उप योजना क्षेत्रात आदिवासी विकास विभागाकडून निधी दिला जातो. या निधीतून सन २००६-०७ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा योजना मंजूर केलेल्या गावांना / वाडयांना निधीचा पहिला हप्ता मुक्त करण्यात आला आहे. परंतु, ही आदिवासी गावे /वाडया अद्याप हागंदारी मुक्त झाली नसल्यामुळे या गावांच्या/ वाडयांच्या योजनेस निधीचा दुसरा हप्ता प्राप्त होऊ शकत नाही. ही गावे/वाडया हागंदारी मुक्त होण्यासाठी आणखी काही कालावधी लागणार आहे. अंमलबजावणी सुरू असलेल्या योजनांना ती गावे / वाडया हागंदारी मुक्त न झाल्याने निधीचा दुसरा हप्ता न मिळाल्याने त्या योजना निधी अभावी अपूर्ण राहिल्या आहेत. त्यामुळे, आदिवासी उप योजनेचा निधीही अखर्चीत राहण्याची शक्यता आहे. म्हणून आदिवासी उप योजनेअंतर्गत निधीचा पहिला हप्ता मुक्त केलेल्या गावे/वाडयांच्या योजना पूर्ण होण्याच्या दृष्टिने व आदिवासी उप योजनेचा निधी खर्च होण्याकरिता हागंदारी मुक्ततेची अट सन २००६-०७ या आर्थिक वर्षाकरिता शिथिल करण्याची तसेच, विंधण विहिर कार्यक्रमासाठीची हागंदारी मुक्ततेची अट शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून शासन पुढील प्रमाणे आदेश देत आहे:-

(१) सन २००६-०७ या आर्थिक वर्षात आदिवासी उप योजने अंतर्गत आदिवासी भागातील गावात/वाडीत पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी ज्या गावांस/ वाडीस निधीचा पहिला हप्ता देण्यात आला आहे, ते गाव/वाडी योजनेसाठी निधीच्या दुसऱ्या हप्त्याची मागणी करताना १०० % हागंदारी मुक्त झाले नसेल तर, असे गाव/वाडी निधीचा दुसरा हप्ता मिळाल्या पासून पुढील ६ महिन्याच्या कालावधीत हागंदारी मुक्त करण्यात येईल या अटीवर त्या गावास/ वाडीस निधीचा दुसरा हप्ता मुक्त करण्यास हरकत नाही. यासाठी त्या गावा/वाडीकडून तशा आशयाचा ठराव घेण्यात यावा.

(२) विंधण विहिर कार्यकमासाठी हागंदारी मुक्ततेची अट राहणार नाही.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००७०२१७१३२५२०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुधाकर ज्ञा. बोबडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व तहसीलदार
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.